INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# ब्रिटीश राजवट : आणि भारतीय शेतकऱ्यांची विविध प्रांतातील आंदोलने

## (British rule and Indian peasant movements in various provinces)

**प्रा.डॉ. बी. डी. जाधवर**
इतिहास विभाग प्रमुख,
बलभीम महाविद्यालय, बीड

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/02.2024-54332454/IRJHIS2402002

**प्रस्तावना :**

भारताच्या इतिहासाचा मागोवा घेतला तर असे स्पष्ट होते की, प्राचीन कालखंडापासून ते आधुनिक कालखंडाच्या मध्यापर्यंतची जर भारताची राजकीय, सामाजिक आर्थिक स्थिती पाहिली तर अनेक समस्यांनी भारताचा कालखंड निहाय इतिहास तयार झालेला आहे. प्राचीन कालखंडाचा विचार केला तर या देशावर अनेक परकीय सत्तानी आक्रमणे करून देशात वास्तव्य करणाऱ्या सर्वच स्तरातील लोकांचे जिवन असहाय्य केले होते. मग त्यामध्ये शेतकरी, कामगार, सर्वसामान्य नागरीक ते उच्चपदस्थांचा पण यात समावेश होता. प्राचीन कालखंडानंतर मध्ययुगीन कालखंडात तर भारतीय समाज अधिकारहिन बनला होता. कारण सुलतान आणि मोगली आक्रमनानी त्यांना जगने कठीण झालेले होते. प्राचीन काळातील शक, कुशन मिनडर शुंगवगाव व इतर राजवटीने तत्कालीन मानव चेतना हिन झालेला होता. या कालखंडानंतर मध्ययुगात तर सुलतानी आणि मोगली आक्रमकांनी भारतीयांचे अस्तित्व नष्ट केले होते. माणूस म्हणून जगण्याचा फक्त त्यांना अधिकार होता बाकी कोणतेही अधिकार भारतीयांना नव्हते. एकंदर वरील दोन्ही कालखंडाच्या आधारे या देशातील इतर वर्गाशिवाय शेतकरी वर्गाची स्थिती अतिशय दैनीय होती. शेतकरी संघटीत नसल्यामुळे स्वतःहाच्या उत्पादीत वस्तूची किंमत ठरवण्याचा अधिकार सुध्दा शेतकऱ्यांना नव्हता. परंतू या सर्व घडामोडीतून भारतीय शेतकरी आणि सामान्य वर्ग बाहेर पडेल अशी परिस्थिती आधुनिक कालखंडाच्या प्रारंभी तयार झालेली होती. परंतू सर्वच बाबतीत ब्रिटीशांच्या भारतातील आगमनामुळे भारतीय शेतकरी आणि इतर क्षेत्रातील नागरीक उदासीन बनले. त्यांना असणारे सर्व अधिकार ब्रिटीशानी काढून घेवून या देशावर एकहाती अंमल प्रस्थापित केला. त्यामुळे सामान्यांची मोठी कोंडी झाली. ती फोडून बाहेर पडण्यासाठी भारतीय शेतकऱ्यांनी देशाच्या विविध प्रांतात अन्यायी राजवटीच्या विरोधात आंदोलने आणि उठाव केलेले होते. त्याविषयीची माहिती आपणास या शोध निबंधाच्या माध्यमातून पहाता येईल.

ब्रिटीश राजवटीत भारतातील विविध प्रांतातील शेतकऱ्यांनी उठाव केलेले होते. हे उठाव पूर्णपणे सावकारशाही आणि जमीनदारांच्या विरोधात केलेले होते. त्या उठावापैकी अयोध्या, मलबार, उत्तर अर्काट, त्रावणकोर याठिकाणी उमाजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली १८२६ मध्ये पुणे जिल्ह्यातील रामोशांचे बंड, खानदेशात भिल्लांचा उठाव, संथालांचा उठाव असे विविध शेतकरी उठाव झाले होते. वरील सर्व झालेले सर्व उठाव हे सशस्त्र होते. अशा उठावापैकी १८५७ च्या उठावात शेतकरी सहभागी झाले होते. त्या आंदोलनांचा प्रांतनिहाय आढावा खालील प्रमाणे घेता येईल.

**निळीचे आंदोलन (१८५९-६०) :-**

बंगाल प्रांतात वास्तव्य करणाऱ्या शेतकऱ्यांनी शेतात निळेचेच उत्पादन घ्यावे असे बंधन घातले होते. परंतू ज्या शेतीत निळीचे उत्पादन घेतले जात होते. ती शेती युरोपीयन लोकांच्या मालकीची होती. इ.स. १८५९ मध्ये निळ उत्पादक शेतकऱ्यांच्या मनात असंतोष निर्माण होऊन त्यांनी आपल्या जमिनीत निळीचे उत्पादन न घेण्याचा निर्णय घेतला. वरील आंदोलनाची व्याप्ती बंगाल मधील विविध भागात वाढत गेली. यावेळी आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या शेतकरी नेत्यांना प्रशासनाने अटक करण्याचा प्रयत्न केला. तेंव्हा शेतकऱ्यांनी पोलीस ठाणे व पोलीस यांच्यावर हल्ले केले. तेंव्हा संघटीत असलेला प्रतिकार नष्ट करणे ही गोष्ट मळेवाल्यांच्या हाताबाहेर गेली. यामुळे अनेक निळीचे कारखाने बंद करावे लागले. कारण बंगालच्या सर्वच जिल्ह्यातून निळीचे उत्पादन थांबले होते. या आंदोलनास बंगालमधील बुध्दीवाद्यांचा आणि अनेक वृत्तपत्रांचा पाठिंबा होता. त्यामुळे मळेवाल्यांच्या मार्फत शेतकऱ्यांवर जे अत्याचार केले होते. त्याचे वर्णन दीनबंधू मित्र यांच्या नीलदर्प या नाटकास मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी मिळाली. याचा परिणाम असा झाला नोव्हेंबर १८६० मध्ये सरकार तर्फे असे स्पष्ट केले की, शेतकऱ्यांवर निळ उत्पादनाची सक्ती केली जाणार नाही.

**पबना येथील शेतकरी उठाव (१८६०-१८८५) :-**

पूर्व बंगालमधील पवना जिल्ह्यात १८७० ते ८० च्या दरम्यान वरील आंदोलन उभे राहिले होते. कायद्याने निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा जमिनीचा कर वाढवला हे पवना येथील उठावाचे मुख्य कारण होते. या विरोधात अनेक जिल्ह्यात मोठमोठ्या सभा होऊ लागल्या. त्यामुळे जमीनदार घाबरले. शेतकऱ्यांनी वाढीव जमीन महसूल देण्यास नकार दिला होता. अनेक ठिकाणी हिंसक आंदोलने झाली. त्याठिकाणी सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले. शेवटी १८८५ मध्ये सरकारने ***"बेंगाल टेनेन्सी ॲक्ट"*** हा तातपुरता कायदा पास करून उठाव शांत करण्याचा प्रयत्न केला.

**उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांचा उठाव :-**

इतर राष्ट्रांच्या तुलनेत उत्तर प्रदेशातील किसान सभा अतिशय सक्रीय होती. उदा. म्हणून १९१९ पर्यंत उत्तर प्रदेशातील १७३ तहसिलमध्ये किसान सभेच्या ४५० शाखा स्थापन झालेल्या होत्या. १९१९ मध्ये अमृतसर याठिकाणी किसान सभेचे वार्षीक आधिवेशन बोलावण्यात आलेले होते. त्यासाठी अनेक शेतकरी प्रतिनिधी उपस्थीत होते. उत्तर प्रदेशातील प्रतापगड जिल्ह्यात जमीनदारांच्या विरोधात न्हावी, धोबीबंद आंदोलन सुरु होते. या आंदोलनाचे नेतृत्व बाबा रामचंद्र हे सुप्रसिध्द नेते म्हणून उदयास आले होते. बाबा रामचंद्र हे अतिशय कुशल संघटक होते. त्यांनी पंडीत नेहरूंना

सातत्याने भेटून खेडेगावातील कुळांची माहिती प्रत्यक्ष गावात येऊन घेण्याची विनंती केली. परंतू १९२० मध्ये बाबा रामचंद्र यांना अटक झाली. त्यामुळे उत्तर प्रदेश किसान सभेत मतभेद वाढत गेले. त्यामधून अवध किसान सभा ही पर्यायी किसान सभा स्थापन झाली. त्याचे अधिवेशन डिसेंबर १९२६ मध्ये अयोध्या येथे आयोजीत केले होते. परंतू ब्रिटीशांच्या दडपशाहीच्या धोरणामुळे उत्तर प्रदेशात सुरु झालेले किसान आंदोलन दडपण्यात आले.

**पंजाबमधील शेतकरी आंदोलन :-**

पंजाबमधील पश्चिम पंजाबमध्ये जमीनीदारी पध्दत अस्तित्वात होती. परंतू १९३० च्या दशकाच्या प्रारंभी पंजाब प्रांतात किसान सभा स्थापन झाल्या होत्या. त्या सर्व सभानी संबंधीत शेतकरी वर्गास संघटीत करून वरिल किसान सभेच्या माध्यमातून काही मागण्या त्यांनी केल्या होत्या. त्यापैकी शेतसारा कमी करणे, कर्जवसुली स्थगीत करणे, अमृतसर व लोहार जिल्ह्यातील जमीन महसूलाचे पुर्ननिर्धारण करणे, पाणी पट्टीमधील वाढ कमी करणे, वरील मागण्यासाठी मोर्चे आंदोलने करून किसान सभेने मागण्या पदरात पाडून घेण्यात काही प्रमाणात यशस्वीता दाखवली होती.

**बंगालमधील तेभागा चळवळ :-**

भारतातील विविध राज्यातील शेतकरी चळवळीच्या तुलनेत बंगालमधील तेभागा चळवळ ही वेगळी होती आणि हिंसक स्वरुपाची होती. त्याचे कारण म्हणजे बंगालमधील बटाईदार शेतकऱ्यांनी एकूण उत्पन्नाच्या अर्धा हिश्याऐवजी एकतृतीयांश हिस्सा जमीनदारांना देण्याची घोषणा केली. त्यामुळे जमीनदार विरूध्द कुळे असा संघर्ष सुरु झाला. अनेक ठिकाणी दोन्ही गटामध्ये संघर्ष सुरु झाला. त्यामध्ये जवळपास २० तरूण शेतकऱ्यांचे निधन झाले. त्यामुळे बंगालच्या अनेक प्रांतात ही चळवळ पसरत गेली. या चळवळीचे नेतृत्व अनंतसिंग, अजितरे, समर गांगुली, भवानीसेन कृष्ण विनोदरे या मंडळीने खंबीरपणे नेतृत्व केले होते. त्यामुळे या चळवळीचा परिणाम असा झाला की, जमीनदाराकडून होणारे शोषण कमी झाले. जमीनदार वर्गात दहशत निर्माण झाली. सरकारचे आदिवासी जनतेच्या प्रश्नाकडे लक्ष केंद्रीत झाले. त्यामुळे सरकारने काही कायदे करून त्यांच्या विकासासाठी प्रयत्न सुरु केले. याने बटाईपध्दती आणि खंड पध्दतीने होणारे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण कमी झाले. हा महत्वाचा निर्णय वरील आंदोलनामुळे झाला होता.

**मुंबई प्रांतातील शेतकऱ्यांचे उठाव आणि चळवळी :-**

महात्मा ज्योतीराव फुले यांनी शेतकऱ्यांचा आसूड नावाचा ग्रंथ लिहून त्यामध्ये सावकारशाही, नौकरीशाही, भिक्षुकशाही हे तिन्ही घटक खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे शत्रु आहेत आणि तेच शत्रु शुद्र -अतिशुद्र शेतकऱ्यांचे कसे शोषण करतात हे विस्ताराने मांडले आहे. सावकारी व्यवसायात मारवाडी, गुजर, व्यापारी, लिंगायत वगैरे आहेत. त्यासंबंधी त्यांनी मोठ्या प्रमाणावर लिखान केले होते. परकीय बाजारपेठेशी भारतीय बाजारपेठ जोडल्याने परदेशी आर्थिक महामंदीचा फटका भारतीय शेतमालाला बसू लागला होता. शेतीमालाच्या किंमती एवढ्या घसरल्या की शेतकऱ्यांना शेतसाराही देणे कठीण झाले होते. यामुळे शेतकरी वर्गात कमालीचा असंतोष निर्माण झाला. तेंव्हा अनेक

शेतकरी एकत्र आले आणि नगर- पुणे जिल्ह्यातील सावकारांच्या घरावर हल्ले करून कागदपत्रे जाळून टाकली. वरील आंदोलनाची दखल घेवून शासनाने यासाठी एक आयोग स्थापन केला. अनेक सावकाराकडून शेतकऱ्यांची होत असलेली आर्थिक पिळवणूक थांबवण्यासाठी सावकारी नियंत्रण कायदा पास केला. परंतू शेतकऱ्यांची पिळवणूक मात्र थांबली नाही. अशा प्रकारे वरील प्रमाणे ब्रिटीश राजवटीत भारतांच्या विविध प्रांतात शेतकरी आंदोलने शासनाच्या विरोधात झालेली होती. त्याविषयी विविध प्रांतात शेतकरी आंदोलने शासनाच्या विरोधात झालेली होती. त्याविषयी विस्ताराने वरिल प्रमाणे मांडणी या शोध निबंधात केलेली आहे.

**संदर्भ सूची :-**

१. डॉ. गाठाळ एस.एस. , आधुनिक भारताचा इतिहास : कैलास पब्लिकेशन्स, सप्टें.२०१६.

२. दीक्षीत राजा : एकोणीसाव्या शतकातील महाराष्ट्र - मध्यमवर्गाचा उदय, डायमंड पब्लिकेशन, पुणे-२००९.

३. मोरे दिनेश - आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास.

४. वाळिंबे रा.श. – १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक पुर्नघटना भाग-१ पुणे १९६२.

५. कुलकर्णी ल.ग. :- स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती महाराष्ट्र राज्य साहित्य, सांस्कृतिक मंडळ, मुंबई १९८८.